# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.सोमेश्वरनगर

## ता.बारामती,जि.पुणे

जा.क्रं./ऊस विकास/परिपत्रक/६०७/२०२४-२५ दिनांकः २१/०५/२०२४

## परिपत्रक

लागण हंगाम सन २०२४-२५ साठी व गाळप हंगाम सन २०२५-२६ करिता मा.संचालक मंडळाने मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगांव व वसंतदादा शुगर इंस्टिट्युट मांजरी बु।। पुणे यांचे सल्ल्यानुसार खालीलप्रमाणे ऊस लागण नियोजन केलेले असुन त्याप्रमाणे पुढील हंगामात सभासद / शेअर मागणीदार यांनी ऊस लागण करावी.

**मा.ऊस तोडणी वाहतुक व ऊसविकास उपसमिती सभा दि.२०/०५/२०२४ ठराव क्रं.३ नुसार**

| अ. नं. | लागवड हंगाम | हंगामाचा कालावधी | ऊस जाती | ऊस तोडणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | आडसाली | ०१ जुलै ते १४ ऑगस्ट | को.८६०३२<br>व्हि.एस.आय.९८०५<br>को.एम.०२६५ | कारखाना चालु झालेपासुन तोडणी चालु<br>कारखाना चालु झालेपासुन तोडणी चालु<br>आडसाली को.८६०३२ व व्हि.एस.आय. ९८०५ ची तारखे नुसार तोडणी संपलेनंतर |
| | टिप : दि.०२/०७/२०२४ ते दि. ०३/०७/२०२४ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील व दि.०४/०७/२०२४ ला नोंदी घेणे चालु होईल. दि. ०५/०७/२०२४ ते दि. ०६/०७/२०२४ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील व दि. ०७/०७/२०२४ पासुन नोंदी घेणे चालु होईल. | | | |
| २ | पुर्व हंगामी | ०२ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर<br>०२ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर<br>०२ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर<br>०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर<br>०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर<br>०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर | को.८६०३२<br>व्हि.एस.आय.९८०५<br>को.एम.०२६५<br>एम.एस.१०००१<br>फुले ऊस १५०१२<br>व्हि.एस.आय.०८००५ | आडसाली ऊसाची तोडणी संपलेनंतर<br>आडसाली ऊसाची तोडणी संपलेनंतर<br>आडसाली ऊसाची तोडणी संपलेनंतर<br>डिसेंबर पासुन तोडणी चालु<br>डिसेंबर पासुन तोडणी<br>१ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| ३ | सुरू | १६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१६ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>१ मार्च ते ३१ मार्च ऊसरोप लागण | एम.एस.१०००१<br>को.८६०३२<br>व्हि.एस.आय.०८००५<br>व्हि.एस.आय.९८०५<br>फुले ऊस १५०१२<br>को.एम.०२६५<br>वरील सर्व ऊस जाती | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु<br>१५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु<br>१५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु<br>१५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु<br>१५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु<br>आडसाली व पुर्व हंगामी ऊस संपलेनंतर<br>आडसाली व पुर्व हंगामी ऊस संपलेनंतर |
| ४ | खोडवा | हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा<br>हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा<br>हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा<br>हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा<br>हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा<br>हंगाम संपेपर्यंत तुटलेल्या ऊसाचा खोडवा | को.८६०३२<br>व्हि.एस.आय.९८०५<br>एम.एस.१०००१<br>को.एम.०२६५<br>व्हि.एस.आय.०८००५<br>फुले ऊस १५०१२ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु<br>१५ डिसेंबर पासुन तोडणी चालु<br>१ जानेवारी पासुन तोडणी चालु<br>१ जानेवारी पासुन तोडणी चालु<br>१५ जानेवारी पासुन तोडणी चालु<br>१५ जानेवारी पासुन तोडणी चालु |

**खोडवा व पुर्व हंगामी हंगामातील लवकर पक्व होणाऱ्या(एम.एस.१०००१,व्हि.एस.आय.०८००५)ऊसाच्या तोडणीचा कार्यक्रम आडसाली ऊस शिल्लक राहिला तरी नियमाप्रमाणे केला जाईल. सदरचे परिपत्रक १०००० एकर आडसाली ऊस गृहित धरून केले आहे.**

### सर्वसाधारण सुचना :

१) कारखान्याचे पोटनियम क्रं.१७(अ)२,३ I,II,III नुसार सभासदाने मालक संरक्षित कुळ अथवा साधे कुळ सह हिस्सेदार या नात्याने त्याने धारण केलेल्या व प्रत्यक्ष त्याच्या ताब्यामध्ये असलेल्या क्षेत्रामधुनच ऊस नोंद देणे बंधनकारक आहे व तशी नोंद त्याने धारण केलेल्या शेतजमिनीचे शासकीय महसुली रेकॉर्डला असणे बंधनकारक आहे व अशाच ऊस नोंदीचे क्षेत्र गाळपास स्विकारले जाईल.

२) सभासदाचे धारण किंवा मालकी हक्काचे शेतजमीन वा ऊस नोंदीबाबत वाद उपस्थित झालेस त्याची जबादारी संबंधीत सभासदाची राहील व असा ऊस स्विकारणेचे कारखान्यावर बंधन असणार नाही मात्र कायदेशीर बाबीवर झालेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

३) कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झालेनंतर ऊस नोंदणीबाबत व गाळपाबाबत तसेच ऊस बिलांबाबत उपस्थित होणाऱ्या तक्रारी संबंधाने कारखाना पोटनियम व परिपत्रकिय धोरणानुसारच कार्यवाही केली जाईल. मे.न्यायालयामध्ये प्रलंबीत प्रकरणांवर मे.न्यायालयाच्या निर्णयानुसार अंतिम कार्यवाही केली जाईल. मे.न्यायालयीन प्रक्रियेमध्ये विलंबामुळे होणारे संबंधितांचे नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही.

४) सभासदांचे अंतर्गत कौटुंबिक शेतजमिनीच्या प्रश्नांमुळे निर्माण होणारे वाद व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबादारी संबंधीत सभासदाची राहील,सभासदाने आपले वाद,प्रश्न आपल्या स्तरावर अगर मे.न्यायालयामध्ये अगर योग्य त्या न्यायाधिकरणाकडे परस्पर दाद मागुन निर्णित करून घ्यावेत व तसे कारखान्यास लेखी स्वरूपामध्ये कळविल्यानंतरच सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे वाद,प्रश्न संपुष्टात न आलेस त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबंधीत सभासदाची राहील.

**५) सभासदांनी त्यांच्या एकुण ऊस लागण क्षेत्रापैकी आडसाली ४०%,पुर्व हंगामी १५%, सुरु १०%,खोडवा ३५% या प्रमाणात ऊस लागणीचे नियोजन करावे.**

६) सभासदांची ऊस लागवड आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस बेणे लागवडीपुर्वी १०० लि.पाणी+३६ ग्रॅम इमिडाक्लोप्रिड(७० टक्के wg )+ १०० ग्रॅम बावीस्टीनची १० मिनिटापर्यंत बेणे प्रकिया करावी व त्यानंतर बेणे ॲसिटोबॅक्टर १ लि. व पी.एस.बी.(स्फुरद विरघळणारे जिवाणू)१ लि.आणि वसंत ऊर्जा १ लिटर २०० लिटर पाण्यात मिसळुन तयार केलेल्या द्रावणात ऊसाची टिपरी ३० मिनिट बुडवून लागण करावी.जैविक खते व व्ही.एस.आय.निर्मित वसंत ऊर्जा कारखान्याकडे नाममात्र दरात उपलब्ध आहेत. तसेच माती परिक्षण करून शिफारशीत प्रमाणात बेसल डोसचा वापर करावा.

मागे पहा

७) ऊस लागण करणेकरिता दि. ०१/०७/२०२४ पासुन परवानगी देणेत आली आहे. त्याचे ऊस लागण नोंदीचे फॉर्म सभासदांनी दि.२८/०६/२०२४ पासुन दि. ०१/०७/२०२४ पर्यंत गट ऑफिसमध्ये वेळेत भरून देणेचे आहेत. त्याची क्रमवारी ड्रॉ पध्दतीने दि.०४/०७/२०२४ रोजी काढणेत येईल. त्याची तारीख ०१/०७/२०२४ धरणेत येईल. दि.०२/०७/२०२४ ते दि. ०३/०७/२०२४ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील. दि.०४/०७/२०२४ रोजी एक दिवसासाठी लागण नोंद घेणेत येईल. तसेच दि.०५/०७/२०२४ ते दि.०६/०७/२०२४ पर्यंत लागण नोंदी बंद राहतील. दि.०४/०७/२०२४ च्या लागण नोंदीची क्रमवारी ड्रॉ पध्दतीने दि.०७/०७/२०२४ रोजी काढणेत येईल. त्याची तारीख दि.०४/०७/२०२४ धरणेत येईल. दि.०७/०७/२०२४ पासुन नोंदी घेणे चालु होईल. पुढील नोंदीचे फॉर्म ज्या त्या दिवशी भरून देणेचे आहेत. तसेच दि.०२/०९/२०२४ मधील लागण नोंदी जास्त आलेस सदर नोंदीचा ड्रॉ दि.०५/०९/२०२४ रोजी काढणेत येईल.

८) ऊस नोंद देते वेळी ज्या नावे ऊस नोंद देणार आहे त्यांचे कारखान्याने सभासद / शेअर्स मागणीदार यांना दिलेले ओळखपत्र (स्मार्ट साखर कार्ड) सोबत आणावे अन्यथा लागण नोंद घेतली जाणार नाही.

९) कारखान्याने ठरवुन दिलेल्या तारखेपुर्वी ऊसाची नियमबाह्य लागण केल्यास सदर ऊसाची लागण तारीख ठरवुन दिलेल्या तारखेपासुन पुढे १५ दिवस उशिरा धरली जाईल.

१०) रोप लागण ज्या दिवशी शेतात केली जाईल त्या दिवशीचीच लागण तारीख नोंद घेतली जाईल. लागण तारखेनुसार ऊस तोडीसाठी आडसाली हंगामातील महिन्यानुसार खालील क्रमवारी प्रमाणे तोडणी कार्यक्रम राबविणेत येईल.

अ) ७ व्या(जुलै) महिन्यातील तुटणाऱ्या ऊसास तारखेनुसार को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ या ऊस जातीच्या रोप लागणीस प्रथम व त्यानंतर त्या त्या तारखेच्या को.एम.०२६५ या जातीच्या रोप लागणीच्या ऊसास तोड देण्यात येईल.

ब) आडसाली हंगामातील दि.०१/०७/२०२४ च्या को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ या ऊस जातींच्या टिपरी लागणीस प्रथम व त्यानंतर दि.०१/०७/२०२४ च्या को.एम.०२६५ या ऊस जातीच्या टिपरी लागणीस व त्यासोबत आडसाली हंगामातील ८ व्या(ऑगस्ट) महिन्यातील को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ या ऊस जातीच्या रोपास व नंतर को.एम.०२६५ जातींची ऊस रोपे लागणीस तोड देणेत येईल.

क) वरीलप्रमाणे दि.०४/०७/२०२४ व ०७/०७/२०२४ ते ३१/०७/२०२४ पर्यंत तुटणाऱ्या ऊसास तारखेनुसार को.८६०३२,व्हि.एस.आय.९८०५ या जातींच्या टिपरी लागणीस प्रथम व त्यानंतर त्या त्या तारखेच्या को.एम.०२६५ या जातीच्या टिपरी लागणीच्या ऊसास तोड देणेत येईल.

ड) ८ व्या (ऑगस्ट) महिन्यातील को.८६०३२, व्हि.एस.आय.९८०५ या जातींच्या टिपरी लागणीस व त्यानंतर को.एम.०२६५ या जातीच्या टिपरी लागणीच्या ऊसास तारखेनुसार तोड देणेत येईल. तसेच इतर हंगामातील प्रत्येक महिन्यातील ऊस जातीची रोपे व त्यानंतर आडसाली प्रमाणे अनुक्रमे टिपरी लागणीच्या ऊसास तोड देण्यात येईल.

११) सभासदांनी आडसाली ऊस सरसकट कापुन काढलेचे निदर्शनास आलेस त्या ऊसाची लागण तारीख रद्द होईल व सभासदांना त्या ऊसाची लागण तारीख पुन्हा नव्याने देणे बंधनकारक राहिल व सदर ऊसाची नव्याने दिलेली नोंद खोडवा म्हणुन घेणेत येईल. अशा खोडव्यास व्यवस्थापनाने दिलेले कोणत्याही प्रकारचे अनुदान लागु होणार नाही.

१२) ऊसाची लागण ४.५ फुट किंवा ५ फुट पट्टा पध्दतीने केल्यामुळे प्रती एकरी ऊस उत्पादनात वाढ होत असुन पट्टा पध्दतीने लागवड केल्यामुळे ऊसावरील किड व रोग नियंत्रित करणे सोपे जाते.

१३) हार्वेस्टरने ऊस तोडणी करीता पट्टा पध्दतीने लागण करणे गरजेचे आहे. तसेच हार्वेस्टरव्दारे ऊस तोडणीला प्राधान्य देणेत येत असल्याने सर्व सभासदांना आवाहन करणेत येते की ऊस लागण करताना रूंद सरी अथवा पट्टा पध्दतीचा अवलंब करावा तसेच हार्वेस्टरव्दारे ऊस तोड येणे पुर्वी २० दिवस आधी ऊस प्लॉटला पाणी देणे बंद करावे. अन्यथा तोडणी मजुरांच्या उपलब्धते अभावी स्वतः ऊस तोडुन कारखान्यावर आणावा लागेल याची नोंद घ्यावी.

१४) प्रती एकरी १० मे.टन किंवा त्या पेक्षा कमी ऊस असणाऱ्या क्षेत्राची ऊस तोडणी मजुर करीत नसल्यामुळे सदरचा ऊस पोटनियम नं.१८(अ) २ नुसार तसेच पोटनियम ५९ मधील तरतुदी नुसार उत्पादकास स्वतः तोडुन कारखान्यावर पोहोच करावा लागेल.

१५) परिपत्रकानुसार सभासदाने लागण क्षेत्राची नोंद ज्या त्या वेळी देणेची आहे, तसेच लागण नोंद करेक्ट करतेवेळी ऊस बेणे टिपरी मातीआड करून सदर क्षेत्रास पाणी देणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील क्षेत्राची लागण नोंद रद्द केली जाईल. त्याचप्रमाणे ऊस लागण नोंदणीबाबत काही तक्रार असल्यास ऊस लागण नोंद दिलेनंतर १५ दिवसाचे आत अर्ज देणे, त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच नंतर कोणत्याही प्रकारची नोंद रूजवात घेताना अथवा गाळप हंगाम चालु झाल्यानंतर घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) ऊस उत्पादकांनी दिलेली लागण नोंद खोटी(बोगस)असल्यास रू.५००/- ऊस बिलातुन वसुल केली जाईल व त्याची नोंद रद्द केली जाईल. सदर रद्द केलेल्या क्षेत्राची नोंद सभासदाने पुन्हा देणे आवश्यक आहे.

१७) सभासदांना कारखान्याच्या सोई-सवलती उदा.ऊस बियाणे, ऊस रोपे, माती,पाणी परिक्षण, ताग व ध्यैंच्या, सबसॉईलर, बायोकंपोस्ट खत इ. सुविधा शेअर्सच्या प्रमाणात दिल्या जातील. सदर सोई सवलतीच्या मागणी अर्जासोबत सभासदाने आपले फोटो ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

१८) मध्यम ते हलक्या जमिनीत ऊस लागवड करणाऱ्या सभासदांनी पुर्व हंगामी व सुरू हंगामात को.८६०३२, एम.एस. १०००१, व्ही.एस.आय.९८०५ व फुले ऊस १५०१२ या ऊस जातींची लागवड करावी.

१९) ७/१२ प्रमाणे नोंदी देणे बंधनकारक आहे. सदरची नोंद मयत वारस प्रकरण, घरगुती वाटप, खरेदी-विक्री किंवा ७/१२ बदल झालेस ऊस नोंद क्षेत्र वर्ग करून घ्यावे. अन्यथा नोंदीप्रमाणे ऊस गळीतास आणला जाईल.

२०) ऊस विकास परिपत्रक जा.क्र.३७३६ दि. ०७/११/२०१८ नुसार ऊस वाढ प्रोत्साहन योजनेत ज्या सभासदांस भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी नोंदणी रक्कम रू.१००/- भरून आपला सहभाग नोंदवावा. सदर योजनेमध्ये यापुर्वी बक्षिस मिळालेले सभासद पुन्हा बक्षिसास पात्र राहणार नाहीत.

२१) सदरचे लागण नियोजन परिपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

तरी वरील सुचनांचे पालन करून सर्व सभासदांनी सहकार्य करावे ही विनंती.

**आपले नम्र**

| (राजेंद्र ना.यादव ) | (बाळासाहेब ज्ञा.कामथे) | (पुरूषोत्तम रा.जगताप) |
|---|---|---|
| कार्यकारी संचालक | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**व**

**संचालक मंडळ**